# द्विशतकवीर बनला शुभमन गिल

**बर्मिंगहम । वृत्तसंस्था**

कर्णधार शुभमन गिलने इंग्लंडविरुद्ध सुरु असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात द्विशतक रचत इतिहास निर्माण केला आहे. भारतीय कर्णधाराने इंग्लंडविरुद्ध द्विशतकीय कामगिरी करणाऱ्या पहिल्या कर्णधाराच्या रुपात त्याने आपले नाव कोरले आहे. भारताचा युवा कर्णधार शुभमन गिलने आपले शब्द अखेर खरे करून दाखवले. शुभमन गिलला जी गोष्ट आतापर्यंत आयुष्यात कधीही करता आली नव्हती ती त्याने आता दुसऱ्या कसोटीत करुन दाखवली आहे.

पहिल्या कसोटीत भारताचा पराभव झाला, या पराभवासाठी भारताच्या तळाच्या फलंदाजांना दोषी ठरवलं गेलं. पण शुभमन गिलने मात्र त्यांना दोषी न ठरवता एक महत्वाची गोष्ट सांगितली होती. शुभमन गिल म्हणाला होता की, भारताच्या पराभवासाठी फक्त तळाच्या फलंदाजांना दोष देण्यात काहीच हशिल नाही. दोष द्यायचा असेल तर तो मलाही दिला जाऊ शकतो. मी गेल्या सामन्यात १४७ धावांवर



बाद झालो. पण त्यानंतर मी खेळपट्टीवर उभा राहीलो असतो, तर अजून धावा झाल्या असत्या आणि भारताला मोठी धावसंख्या उभारता आली असती. दुसऱ्या कसोटीत यशस्वी जयस्वाल बाद झाला आणि त्यानंतर भारतीय संघ अडचणीत येईल, असे सर्वांना वाटत होते. पण त्याचवेळी शुभमन गिलने कर्णधाराला साजेशी खेळी साकारली आणि त्याने आपले शब्द अखेर खरे करून दाखवले. कारण दुसऱ्या कसोटीत खेळताना गिलने सर्वस्व पणाला लावत जी गोष्ट त्याला आतापर्यंत कधीही घडली नव्हती, ती करून दाखवली आहे. शुभमन गिलने दुसऱ्या सामन्यात दमदार खेळी साकारत संघाला तर सावरले, पण त्याने यावेळी जे आतापर्यंत कधीच घडलं नव्हतं ते करुन दाखवलं. आतापर्यंत कसोटी मालिकेत शुभमन गिलला आतापर्यंत कधीच १५० धावांचा टप्पा कधीच गाठता आला नव्हता. गेल्या सामन्यात तो १४७ धावांवर बाद झाला होता. त्यावेळी त्याने आपण अजून जास्त काळ खेळपट्टीवर उभं राहायला हवं होतं, असं म्हटलं होतं. पण या सामन्यात मात्र शुभमन गिलने दीड शतक पूर्ण केलं आहे आणि ही त्याच्या कसोटी कारकिर्दीतील सर्वोच्च धावसंख्या ठरली आहे. शुभमन गिलचे दीड शतक पहिल्या सामन्यात हुकले होते.

## रमेश पाटील यांनी हेक्टरी ७५ क्विंटल मक्याचे उत्पादन घेत पटकावला द्वितीय क्रमांक

**धुळे । प्रतिनिधी**

धुळे, लोणखेडी ता. धुळे येथील माजी ग्रामपंचायत सदस्य, विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे माजी चेअरमन तथा प्रगतिशील शेतकरी रमेश यादवराव पाटील यांचा येथील कृषी महाविद्यालयात नुकत्याच झालेल्या कृषी दिनानिमित्तच्या कार्यक्रमात प्रयोगशील शेतकरी म्हणून सन्मान करण्यात आला. श्री. पाटील यांनी २०२४-२५ या वर्षीच्या खरीप हंगामात मक्याचे हेक्टरी तब्बल ७४.८० क्विंटल उत्पादन घेत धुळे तालुक्यात द्वितीय क्रमांक पटकावला होता. यानिमित्त त्यांना प्रमाणपत्र व तीन हजार रुपयांचे बक्षीस देऊन जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी सीताराम चौधरी यांनी सन्मानित केले.



महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त येथील कृषी महाविद्यालयात राज्य शासनाचा कृषी विभाग, जिल्हा परिषद, पंचायत समितीचा कृषी विभाग व आत्मातर्फे नुकताच कृषी दिनाचा कार्यक्रम झाला. यात जिल्ह्यातील प्रगतीशील शेतकऱ्यांचा विविध पुरस्कारांनी गौरव करण्यात आला. कार्यक्रमांस जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सूरज जगताप, जिल्हा कार्यक्रम अधिकारी अजय फडोळ, जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता मुकेश ठाकूर, आत्माचे प्रकल्प संचालक हितेंद्र सोनवणे, कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. देसले, जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी सीताराम चौधरी, कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ .दिनेश नांद्रे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी नितीन खंडेराय, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गणेश चौधरी आदी उपस्थित होते.

शेतकरी रमेश पाटील हे आपल्या शेतीत सातत्याने विविध पिकांचे भरघोस उत्पन्न घेतात. तसेच त्यांनी आपल्या शेतात विविध फळझाडांची लागवड केली आहे. विशेषतः केशर आंबा, पेरू, चिकू, सीताफळ, रामफळ, लिंबू आदींचेही ते दर वर्षी भरघोस उत्पादन घेत आहेत. विशेष म्हणजे ते स्वतः विविध फळझाडांवर कलमे करून उत्पादन घेण्यात त्यांचा हातखंडा आहे.



## सूर्यकन्या तापी नदीचा जन्मोत्सव

**अजनाड, ता.रावेर । वार्ताहर ।** मध्यप्रदेश सीमेवर पूर्व पश्चिम वाहणारी तापी माईंच्या कुशिमध्ये वसलेले छोटेसे अजनाड गाव येथे साला बाद प्रमाणे आणि २२वर्षाची परंपरा जोपासनारी तापी माई पुजेचा कार्यक्रम मोठ्या उत्सवात करण्यात आला. अजनाड येथील प्रगतीशिल शेतकरी विनायक शामू महाजन हे पारंपारिक मोठ्या उत्सवात कार्यक्रम करत असतात .उपसरपंच विजय महाजन व सहपरिवार यांच्या हस्ते पुजा करण्यात आली. तापी माईस महाजन परिवाराच्या हस्ते साडी अर्पण करण्यात आली. त्या प्रसंगी वैभव महाराज यांच्या हस्ते पूजा करण्यात आली यावेळी प्रल्हाद शामु महाजन, विठ्ठल पाटिल, गोपाल पाटिल, प्रल्हाद सिताराम, सचिन महाजन, अमोल महाजन, प्रमोद महाजन, अतुल महाजन, स्वप्निल पाटिल, गोपाल महाजन व गावातील सर्व मंडळीनी पुजेचा लाभ घेतला तसेच अजनाड येथील विजय महाजन यांचे चिरंजीव निशांक महाजन यांनी सर्वांचे आभार मानले.

## डकबिल सांडवा ओव्हर फ्लो



**पिंपळनेर । प्रतिनिधी ।** पिंपळनेर पश्चिम पट्ट्यात संततधार पावसामुळे जामखेली नदीला मोठा पूर आला असून जामखेली धरण ओव्हरफ्लो झाले आहे. आशिया खंडातला एकमेव डकबिल नावाचा सांडवा ओव्हरफ्लो होताना नागरिकांना आकर्षित करीत आहे. आज धरण ओव्हर फ्लो झाल्यानंतर अनेक नागरिकांनी या डकबिल सांडवा पाहण्यासाठी एकच गर्दी केली होती. नवे नगर ग्रामपंचायतीतर्फे या धरणाचे जलपूजन देखील करण्यात आले.

## स्वखर्चाने स्मशानभूमीची केली स्वच्छता

**टाकरखेडा, ता.अमळनेर वार्ताहर**

### ज्ञानेश्वर पाटील यांची सामाजिक बांधिलकी

येथील सामाजिक कार्यकर्ते तथा माजी सरपंच सौ मंगलाबाई पाटील यांचे पती ज्ञानेश्वर नगराज पाटील यांनी स्वखर्चाने स्मशानभूमीची स्वच्छता केली.या ठिकाणी बोरी, तरोटा,गाजरे गवत, बाभूळ आदी झाडे व गवत यांनी वेढा घातला होता. त्यामुळे स्मशानभूमी भोवती मोठ्या प्रमाणावर घाण साचत होती, स्मशानभूमीत येणाऱ्या लोकांना ही त्याचा त्रास होत असल्याचे लक्षात आल्यावर ज्ञानेश्वर पाटील यांनी स्वखर्चाने ` जेसीबी मशीन व चालक बोलवून आजूबाजूच्या परिसराची स्वच्छता करून घेत गावात चांगल्या कामाचे



उदाहरण दाखवून दिले. तसेच स्मशानभूमी जवळ पाण्यासाठी ग्रामपंचायतीने हौद बांधून दिला आहे, परंतु त्यात नेहमीच पाणी राहत नसे या ठिकाणी दशक्रिया साठी येणारे गावातील ग्रामस्थ यांना विहिरीवरून पाणी आणावे लागत होते.ग्रामस्थाची अडचण ओळखून त्यांनी स्वतः पाईपलाईन टाकुन एक वर्षाहून अधिक कालावधी पासून हौद पाण्याने भरून देत आहे. त्यामुळे ग्रामस्थां बरोबर पाळीव प्राण्यांची ही पिण्याच्या पाण्याची सोय झाली. त्यांच्या या कामाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



## खोटा गुन्हा मागे घ्या, समर्थकांचा एल्गार, प्रशासनाच्या विनंतीवर मोर्चा थांबवला

**धुळे । प्रतिनिधी**

सामाजिक कार्यकर्ते व महापालिकेचे माजी स्थायी समिती सभापती दीपक उर्फ बंटी खोपडे यांच्याविरोधात राजकीय सूडबुद्धीने दाखल करण्यात आलेला छेडछाडीचा गुन्हा तात्काळ रद्द करावा, अशी मागणी खोपडे समर्थकांनी केली. यासाठी चाळीसगाव रोड येथून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, प्रशासनाच्या विनंतीवर मोर्चा थांबवण्यात आला आणि लेखी निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली.

दि.२० जून रोजी शहादा येथील एका महिलेने खोपडे व इतर चौघांविरोधात चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात छेडछाडीचा गुन्हा दाखल केला. मात्र, ही तक्रार पूर्णतः खोटी असून, बंटी खोपडे यांची वाढती लोकप्रियता आणि आगामी महापालिका निवडणुकीत संभाव्य विरोध लक्षात घेऊन राजकीय दबावाखाली हा एफआयआर दाखल केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.या प्रकरणात गजेंद्र अंपळकर नावाच्या स्थानिक नेत्यावरही निशाणा साधण्यात आला असून, त्यांच्या सांगण्यावरूनच तपास सुरू असल्याचा आरोप समर्थकांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर सुरेश खोपडे, ओम शर्मा, किरण बागुल यांच्यासह पन्नासहून अधिक महिला समर्थकांनी पोलीस अधीक्षक व जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करून गुन्हा मागे घेण्याची मागणी केली आहे.

### माऊलीला भेटण्या माऊली निघाली
## निष्ठुर काळाने संधी साधली

**सोलापूर । वृत्तसंस्था ।** संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या पालखी



सोहळ्यासोबत तुळजापूर तालुक्यातील सिंदफळ गावाची एक पालखी देहुतून पायी चालत निघाली होती. मजल-दर मजल करत हा पायी पालखी सोहळा पंढरपूरच्या अगदी काही अंतरावरच आला होता. पायी चालणाऱ्या दिंडीतील भाविकांना श्री.विठ्ठलाची ओढ लागलेली होती.रात्री हा पालखी सोहळा तोंडले-बोंडले या गावानजीक मुक्कामी होता. पहाटे लवकरच हा पालखी सोहळा निघण्याच्या तयारीत होता. मात्र अचानक विपरीत घडलं.

एक महिला भाविकाने रस्ता पार करण्याच्या नादात समोरून भरधाव वेगाने आलेला ट्रक पाहिलाच नाही. भरधाव ट्रकने समोरून जोराची धडक दिल्याने या महिला भाविकचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. उशाबाई अशोक व्यवहारे असे मृत महिला भविकाचे नाव आहे. विठुरायाच्या दर्शनाची त्यांची अंतिम इच्छा अपूर्णच राहिली. सिंदफळ गावातून दरवर्षी या गावाची पायी दिंडी संतश्रेष्ठ तुकाराम महाराज या पालखी सोहळ्यात सहभागी होत असते. या सोहळ्यासाठी मागील अनेक वर्षापासून उशाबाई व्यवहारे या जात होत्या. मात्र पहाटे साडेचार वाजण्याच्या सुमारास तोंडले-बोंडले या गावानजीक पालखी सोहळ्यातीलच ट्रकने जोराची धडक दिल्याने उषा व्यवहारे महिला भाविकाचा जागीच मृत्यू झाला आहे. संपूर्ण पालखी सोहळ्यावर शोककळा पसरली आहे. पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनासाठी दरवर्षी हजारो वारकरी पायी वारी करतात. या वारीमध्ये वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी महाराष्ट्र सरकारने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. वारीदरम्यान कोणत्याही वारकऱ्याचा अपघात झाल्यास, त्यांच्या कुटुंबाला सरकार ४ लाख रुपयांची आर्थिक मदत देणार आहे. ही मदत १६ जून ते १० जुलै २०२५ या काळात झालेल्या दुर्घटनेत मिळेल.

**विधीलिखित**

सुरेशराव बोरकर,
ब्रह्मांड ज्योतिष कार्यालय,
रावेर. मो. : ९८५००१५५५८

शुक्रवार, दि. ४ जुलै २०२५

### *-*-* दैनंदिन राशिभविष्य *-*-*

**मेष** - सांसारिक कार्यासाठी वेळ द्यावा लागेल.
**वृषभ** - मानसिक ताण निर्माण होईल.
**मिथुन** - संतती त्यांचे कार्यात प्रगती करतील.
**कर्क** - मातृ कार्यासाठी वेळ द्यावा लागेल.
**सिंह** - कर्तव्यात मन लागेल.
**कन्या** - आर्थिक प्रगती होईल.
**तूळ** - सर्वकाही मनाप्रमाणे होईल.
**वृश्चिक** - मानसिक तणाव घटना घडू लागतील.
**धनू** - सर्व कार्यात आपण यश मिळवाल.
**मकर** - नशिबाची परीक्षा आज होणार आहे.
**कुंभ** - सर्व कार्यात मनाप्रमाणे यश मिळेल.
**मीन** - शारीरिक अस्वस्थता निर्माण होईल.

## सप्तपूटच्या अतुल राठोडला प्रभाकर बरवे पुरस्कार

**सावदा, ता.रावेर । वार्ताहर**

सप्तपुट ललितकला भवन खिरोदा येथिल जी. डी. आर्ट पेंटिंग विभागातील विद्यार्थी अतुल राठोड यांच्या गर्भ या कलाकृतीस प्रभाकर बर्वे पुरस्कार आणि नटखट पुरस्कार असे एक नव्हे तर दोन पुरस्कार प्राप्त झाले. जहांगीर आर्ट गॅलरी येथे मिळणारे दोघंही पुरस्कार कलाक्षेत्रात प्रतिष्ठेचे संबोधले जातात. दि. २९ जून २०२५ रोजी या पुरस्काराचे वितरण कलादालनात करण्यात आले.

जनता शिक्षण मंडळाने चालविलेल्या सप्तपुट ललित कला भवनच्या आमच्या विद्यार्थास गर्भ कलाकृतीस मुंबई येथे जहांगीर आर्ट गॅलरीत दोन पुरस्कार प्राप्त झाले. खिरोद्यासारख्या एका खेडेगावात उच्च कला शिक्षण घेऊन कलोपासना



**जहांगीर आर्ट गॅलरीतील प्रदर्शनात सन्मान**

करता येते व ग्रामीण भागात देखिल विद्यार्थी प्रतिभावान घडत आहेत याचा हा पुरावा आहे. संस्थाचालक म्हणून आम्हाला त्याचा अभिमान वाटतो. यापुढेही आमची कला शिक्षण परंपरा विद्यार्थ्यांना विकसित करण्यासाठी अधिकाधिक प्रयत्नशील राहिल असे माजी आमदार शिरीष चौधरी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना सांगितले.

अतुल राठोड यांनी मांडलेल्या कलाकृतीतील गर्भ हा आशय कलारसिक आवर्जून समजून घेत. गर्भाची गुढता, रहस्यमयता, मानवी गर्भ, प्राणीगर्भ, आणि निसर्गगर्भ यांचा एक गूढ संवाद चित्रात अभिव्यक्त केला आहे. गर्भांतून फक्त शरीर जन्माला येत नाही, तर संवेदना, चैतन्य, आणि चिरंतन सृष्टीचा उगम होतं असतो. गर्भ हे बिज आहे आहे बिझी म्हणजे संभाव्यता सृष्टीचा आद्यकोष आहे. गर्भ ही सृष्टीतील प्रत्येक जीवाच्या गर्भावस्थेचा गूढ आणि रहस्यमय प्रवास उलगडणारी कलाकृती त्यातील आशय आणि विशिष्ट तंत्रशैली रंगसंगती मुळे प्रदर्शनात विशेष उल्लेखनीय ठरली आहे.




देशदूत | हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि.यांच्याकरिता सकाळ मीडिया प्रा.लि., प्लॉट नं.सी-३, एम.आय.डी.सी.एरिया टेलिफोन एक्सचेंजसमोर, औरंगाबाद रोड, जळगाव-४२५००३ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून देशदूत कार्यालय, अमर चित्र मंदिर चौक, नंदुरबार-४२५४१२ येथे प्रसिध्द केले. ● **व्यवस्थापकीय संपादक : विक्रम सारडा.** ● **संपादक : हेमंत दिनेश अलोने*. फोन नं.**: नंदुरबार-२२११०१, जळगाव शहर कार्यालय-२२२८७८१, २२२४६६०, भुसावळ-२२०६८०, २२४७९५, रावेर-२५०४४४, धुळे-२३७९१४, फॅक्स-२३८९१४. **RNI.No. 69123/1998.** (* पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.)

cmyk